# 25 ठाणे लोकसभा मतदार संघ

**146 ओवळा माजीवडा विधानसभा मतदार संघ, भाईंदर (प.),**
**महामानव शिव शाहु फुले आंबेडकर स्मृती सभागृह,बेथनी**
**हॉस्पीटलच्या बाजुला पोखरण रोड न.02 ठाणे(प) 400606**
EMAIL ID : 146election2024@gmail.com

**जा.क्र./निवडणुक/कावि-93 /2023-24** **दि.90/08 /2024**

निवडणुक तात्काळ

## // प्रसिध्दी पत्रक //

25 ठाणे लोकसभा मतदार संघामधील 146 ओवळा माजीवडा वि.म.संघ कार्यक्षेत्रातील मा. सहा. निवडणुक निर्णय अधिकारी श्रीम. शितल देशमुख, नोडल अधिकारी तथा उपायुक्त (शिक्षण), श्रीम. वर्षा दिक्षित यांच्या मार्गदर्शनानुसार 25 ठाणे लोकसभा मतदार संघातील 146 ओवळा माजीवडा वि.म.संघात मिरा भाईंदर महानगर पालिका क्षेत्रात दि.08/04/2024 रोजी बी.पी. रोड मार्केट परीसर, तलाव रोड, भाईंदर पुर्व येथे सायकाळी 05.00 ते 6.00 वाजे पर्यंत स्वीप (sveep) अंतर्गत जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

प्रभाग क्र.03 चे प्रभाग अधिकारी श्री. जितेंद्र कांबळे यांनी मतदार नोंदणी व मतदान जनजागृती संदर्भात उपस्थीतांना माहीती देवुन दि.20/05/2024 सोमवार या दिवशी मतदान असल्याने कुठेही फिरायला न जाता सर्व नागरीकांनी मतदार यादीत नाव असलेल्या आपल्या कुटुंबियास (आई,वडील,भाउ,बहीण,मित्र व शेजारी) मतदान करण्यास प्रोत्साहीत करावे असे आवाहान केले.

सदर कार्यक्रमास मिरा भाईंदर महानगरपालिकेचे प्रभाग क्र.03 चे प्रभाग अधिकारी श्री. जितेंद्र कांबळे, स्वीप (sveep) पथकातील कर्मचारी वर्ग तसेच फेरीवाले, भाजी विक्रेते, गि-हाईक, नागरीक वर्ग मोठया प्रमाणात उपस्थीत होते.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी मतदार नोंदणी करुन दि.20/05/2024 रोजी सर्वांनी मतदान करावे तसेच मतदार नोंदणी व मतदार जनजागृतीच्या राष्ट्रीय कार्यक्रमास सहकार्य केल्या बददल प्रभाग क्र.03 चे प्रभाग अधिकारी श्री. जितेंद्र कांबळे यांनी यांनी सर्व उपस्थीतांचे आभार मानले.

(रवी पवार)
उपायुक्त(मु.) तथा जिल्हा नोडल अधिकारी
स्वीप 146 ओवळा माजीवडा वि.म.स.